शनिवार दि. २९ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# तलाव धोक्यात, शेतकरी संकटात; सरकारने आता आश्वासनांचा खेळ थांबवावा!

## खा. डॉ. कल्याण काळेंचा घणाघात

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या तलावाच्या सांडव्यांच्या भिंतींमध्ये गंभीर स्वरूपाच्या भेगा पडल्याने तलावाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अतिवृष्टीच्या काळात तलावात मोठ्या प्रमाणावर पाणीसाठा झाल्यास या भेगांमुळे भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तलावाच्या सांडव्यांची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे.

खासदार डॉ. काळे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात निवेदन सादर केले असून, त्यामध्ये जालना शहराच्या पाणीप्रश्नाबरोबरच तलावाच्या सुरक्षिततेचा मुद्दाही प्राधान्याने मांडला आहे. तलावाच्या सांडव्यांच्या भिंतींना पडलेल्या भेगा केवळ बांधकामाच्या दृष्टीने चिंतेचा विषय नसून, पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाल्यास त्याचा परिणाम तलावाच्या सुरक्षिततेवर होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**सांडव्यांची तातडीने तपासणी करण्याची गरज**

जालना जिल्ह्यात यंदा पावसाचे स्वरूप असमान राहिले असले तरी अतिवृष्टीच्या घटना घडल्यास अल्प कालावधीत तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी जमा होऊ शकते. अशा परिस्थितीत आधीपासूनच भेगा पडलेल्या सांडव्यांच्या भिंतींवर पाण्याचा मोठा दाब निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी तांत्रिक पथकाच्या माध्यमातून सांडव्यांची सखोल पाहणी करून संरचनात्मक स्थितीचा अहवाल तयार करावा आणि आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

**गाळामुळे पाणी साठवण क्षमता घटली**

तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने त्याची मूळ पाणी साठवण क्षमता कमी झाल्याचाही मुद्दा खासदार काळे यांनी उपस्थित केला आहे. अनेक वर्षांपासून



तलावातील गाळ काढण्याचे काम पुरेशा प्रमाणात झाले नसल्यास पाणीसाठ्याची क्षमता कमी होऊन उपलब्ध जलस्रोताचा अपेक्षित उपयोग करता येत नाही.

तलावातील गाळ काढल्यास पाणीसाठवण क्षमता वाढण्यास मदत होईल. परिणामी जालना शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर करता येईल. त्यामुळे तलावाचे सर्वेक्षण करून गाळ काढण्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**शेतकरी कर्जमुक्ती योजना अधिक सर्वसमावेशक करण्याची मागणी**

दरम्यान, राज्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा योग्य लाभ मिळावा यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' अधिक सर्वसमावेशक पद्धतीने राबविण्याची मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. या योजनेत ३१ मार्च २०१९ पूर्वीची पात्र थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी आहे. अनेक शेतकरी विविध कारणांमुळे कर्जाच्या ओझ्याखाली आहेत. त्यामुळे पात्रता निकष अधिक व्यापक करून प्रत्यक्ष अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनातून स्पष्ट केले आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिक प्रोत्साहन द्यावे**

नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनपर लाभाची कमाल मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत वाढवावी, अशी मागणी खासदार काळे यांनी केली आहे.

कर्जाची वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळाल्यास आर्थिक शिस्त राखणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि भविष्यात कर्जफेडीची प्रवृत्ती वाढण्यास मदत होईल, असा यामागील उद्देश आहे.

**जमीन वर्ग-२चा अडसर दूर करण्याची मागणी**

जमीन वर्ग-२च्या कारणामुळे पात्र शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी आवश्यक ते नियम शिथिल अथवा सुधारित करण्याची मागणीही करण्यात आली आहे. काही शेतकऱ्यांची जमीन वर्ग-२मध्ये असल्याने त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळताना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे केवळ जमीन वर्गीकरणामुळे पात्र लाभार्थी योजनेपासून दूर राहणार नाहीत, याची शासनाने दक्षता घ्यावी, अशी भूमिका खासदार काळे यांनी मांडली आहे.

**कागदपत्रांच्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी वंचित राहू नयेत**

योजनेचा लाभ घेताना कागदपत्रे, ओळख क्रमांक किंवा ऑनलाइन प्रक्रियेशी संबंधित तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याचा फटका पात्र शेतकऱ्यांना बसू नये, याकडेही निवेदनात लक्ष वेधण्यात आले आहे. तांत्रिक कारणांमुळे किंवा कागदपत्रांतील किरकोळ त्रुटींमुळे पात्र शेतकऱ्यांचा लाभ थांबू नये. अशा प्रकरणांसाठी सुलभ पडताळणी व दुरुस्तीची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा**

जालना शहराच्या पाणीप्रश्नापासून ते शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीपर्यंत विविध प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. संबंधित विभागांना स्पष्ट निर्देश देऊन *(पान २ वर)*

# घर कोसळल्याचा दावा फेटाळणाऱ्या बजाज अलियान्झला ग्राहक आयोगाचा मोठा दणका

## *अपील फेटाळत नुकसानभरपाईचा आदेश कायम*

**जालना - प्रतिनिधी**

जमीन खचल्यामुळे अचानक घर कोसळून झालेल्या नुकसानीचा विमा दावा नाकारणे बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनीला चांगलेच महागात पडले आहे. जम्मू आणि काश्मीर राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाने जिल्हा आयोगाचा निर्णय योग्य ठरवत विमा कंपनीचे अपील पूर्णपणे फेटाळून लावले आहे. कोणत्याही शास्त्रीय अभ्यासाशिवाय सर्वेक्षकाने केवळ वरवरच्या तपासणीवरून काढलेले निष्कर्ष विमाधारकाचा कायदेशीर हक्क नाकारण्यासाठी ग्राह्य धरले जाऊ शकत नाहीत, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की, नौहट्टा भागातील मोहम्मद अल्ताफ भट यांच्या विम्याच्या कक्षेत असलेले घर अचानक कोसळले होते. पोलीस नोंदी आणि साक्षीनुसार, याच वेळी आजूबाजूची इतर तीन घरेही कोसळली होती. यावरून ही घटना परिसरातील जमीन खचल्यामुळेच () घडल्याचे सिद्ध होत होते. तरीही बजाज अलियान्झ कंपनीने सर्वेक्षकाच्या अहवालाचा आधार घेत आणि बांधकामातील दोषाचे कारण पुढे करत विम्याचा दावा नाकारला. याविरोधात ग्राहकाने जिल्हा ग्राहक आयोगात धाव घेतली होती. जिल्हा आयोगाने विमा कंपनीला सेवेत त्रुटी ठेवल्याबद्दल दोषी धरून नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले.

या निकालाला विमा कंपनीने राज्य ग्राहक आयोगात आव्हान दिले होते. राज्य ग्राहक आयोगाच्या प्रभारी अध्यक्षा निघात सुलताना आणि सदस्य महीप गुप्ता यांच्या पीठाने संपूर्ण प्रकरणाची सुनावणी घेतली. परिसरातील अनेक इमारती एकाच वेळी कोसळल्याने ही घटना भूगर्भीय हालचालींमुळे घडल्याचे स्पष्ट होते, असे नमूद करत आयोगाने सर्वेक्षकाचा तकलादू अहवाल अमान्य केला आणि जिल्हा आयोगाचा निकाल कायम ठेवला. या महत्त्वपूर्ण निकालावर बोलताना ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, ''ग्राहक आयोगाचा हा निकाल सर्वसामान्य विमाधारकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक आहे.

अनेकदा विमा कंपन्या सर्वेक्षकांच्या अहवालातील त्रुटींचा गैरफायदा घेऊन ग्राहकांचे कायदेशीर दावे फेटाळण्याचा प्रयत्न करतात. मात्र, या निर्णयामुळे हे पुन्हा स्पष्ट झाले आहे की सर्वेक्षक अहवाल अंतिम नसतो आणि न्यायालयीन छाननीमध्ये ठोस वस्तुस्थिती व पुराव्यांसमोर कंपन्यांचे मनमानी दावे टिकू शकत नाहीत. ग्राहकांनी आपल्या हक्कांची जाणीव ठेवून कायदेशीर मार्गाने लढा दिल्यास न्याय निश्चित मिळतो.''

# तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांच्या उपचारांना गती मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ आरोग्याला प्राधान्य

**मुंबई - प्रतिनिधी**

गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून योग्य आहार व देखरेखीद्वारे माता व नवजात शिशुचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. रक्तक्षयामुळे प्रसूतीदरम्यान/नंतर मातेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. तीव्र रक्तक्षय हे माता व नवजात शिशु मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. हीच समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २०१५ मध्ये आरोग्य विभागाला आयर्न सुक्रोजच्या माध्यमातून ॲनिमियावरील उपचार राबविण्याचे निर्देश दिले होते. यामुळे राज्यातील गरोदर मातांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात विभागाने तीव्र रक्तक्षयावरील मोफत उपचारांना गती दिली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंतच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आयर्न सुक्रोजचा सिद्ध आणि परिणामकारक उपचार पोहोचविण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच दुर्गम भागातील गरोदर मातांनाही तीव्र रक्तक्षय विशेष उपचार सुविधा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ व बाल आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग कार्यरत आहे. तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना वेळेत उपचार, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या या प्रयत्नांमुळे सुरक्षित मातृत्वाचा पाया अधिक भक्कम होत आहे.

तीव्र रक्तक्षयावर आयर्न सुक्रोज तसेच फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) या औषधांद्वारे शिरेवाटे उपचार सुविधा राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. एचएमआयएस अहवालानुसार चालू वर्षात (२०२६-२७ जुलैअखेर) नोंद झालेल्या एकूण मातांपैकी तपासणीअंती २३५२४ गरोदर मातांची तीव्र रक्तक्षय असलेल्या अतिजोखमीच्या माता म्हणून निदान झाले आहे. त्यापैकी २१३३७ मातांना आयर्न सुक्रोज किंवा फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) द्वारे उपचार देण्यात आले असून उपचाराचे प्रमाण ९१ टक्क्यांवर पोहोचले आहे.

**तपासणी-निदान-उपचार-पुनर्तपासणीवर भर**

गरोदरपणातील तीव्र रक्तक्षयामुळे माता आणि गर्भाच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे या समस्येचे वेळीच निदान करून उपचार देणे, उच्च जोखमीच्या मातांचा सातत्याने पाठपुरावा करणे आणि उपचारानंतर पुनर्तपासणी करणे यावर राज्य शासनाने विशेष भर दिला आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेमार्फत 'तपासणी-निदान-उपचार-पुनर्तपासणी'ही साखळी अधिक परिणामकारक करण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या 'ॲनिमिया मुक्त भारत अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१८-१९ पासून प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्यावरील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना आयर्न सुक्रोज इंजेक्शनद्वारे उपचार देण्यात येत होते. सन २०२४-२५ पासून राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयर्न सुक्रोजसोबत, अधिक प्रभावी असलेले इंजेक्शन फेरीक कार्बोक्सी माल्टोजही उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे उपचारांचे पर्याय वाढले असून पात्र मातांना गरजेनुसार जलद व प्रभावी सेवा देणे शक्य झाले आहे.

उपचार पद्धतीचा प्रभावी आणि सुरक्षित वापर व्हावा, यासाठी जानेवारी २०२६ मध्ये राज्यस्तरावर वैद्यकीय अधिकारी व संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांचे ऑनलाइन प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच औषधांचा पुरेसा साठा, वेळेत संदर्भ सेवा आणि उच्च जोखमीच्या गरोदर मातांची स्वतंत्र नोंद ठेवून उपचार पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करण्याचे आरोग्य विभागांकडून नियोजन करण्यात आले आहे. या वर्षात जिल्हानिहाय कामगिरीत अनेक जिल्ह्यांनी उल्लेखनीय प्रगती नोंदविली आहे. अहिल्यानगर, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, रत्नागिरी, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यात १०० टक्के तीव्र *(पान २ वर)*

# 'बटन गोळ्या' विकणारी अंतरजिल्हा टोळी जेरबंद

## जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; १९ हजार ८०० रुपयांचा प्रतिबंधित औषधसाठा जप्त

**जालना । प्रतिनिधी**

मानवी आरोग्यास घातक ठरणाऱ्या तसेच एनडीपीएस कायद्यांतर्गत प्रतिबंधित असलेल्या गुंगीकारक औषधी गोळ्यांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या अंतरजिल्हा टोळीचा जालना स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. लक्कडकोट परिसरात छापा टाकून ० .५ या औषधाच्या तब्बल ६ हजार ६०० गोळ्या जप्त करण्यात आल्या असून, त्यांची किंमत सुमारे १९ हजार ८०० रुपये आहे.

या प्रकरणात पोलिसांनी बीड, जालना आणि परभणी जिल्ह्यांशी संबंधित चार आरोपींना अटक केली आहे. न्यायालयाने चारही आरोपींना दि. १ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईमुळे प्रतिबंधित



गुंगीकारक औषधांच्या बेकायदेशीर विक्रीच्या साखळीवर पोलिसांनी मोठा आघात केला आहे.

**लक्कडकोट परिसरात छापा; ११ बॉक्समधून ६६०० गोळ्या जप्त**

जालना जिल्ह्यात मानवी आरोग्यास घातक असलेल्या आणि एनडीपीएस घटक असलेल्या गुंगीकारक औषधी व 'बटन गोळ्या' यांची विक्री करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रतिबंधित औषधांची विक्री व पुरवठा करणाऱ्यांची माहिती घेत होते. दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांना लक्कडकोट परिसरात एक व्यक्ती गोळ्यांची पाकिटे बेकायदेशीररीत्या बाळगून असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ छापा टाकून जफर अहमद खान मंजूर अहमद खान (वय ७५, रा. कारंजा रोड, कटकटपुरा, बीड) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ०.५ कंपनीच्या ६६०० गोळ्या असलेले ११ बॉक्स जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची किंमत १९ हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

या कारवाईनंतर जफर अहमद खान याच्याविरुद्ध जालना येथील *(पान २ वर)*

# जालन्याच्या सार्वजनिक वाहतुकीला 'राजमाता जिजाऊ'ची साथ

## जालना शहरासाठी नवी बससेवा सुरू; आ. अर्जुनराव खोतकरांच्या हस्ते लोकार्पण

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील नागरिकांचा दैनंदिन प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि आरामदायी करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे. जालना शहरासाठी 'राजमाता जिजाऊ बस' उपलब्ध करून देण्याच्या शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मागणीला अखेर यश आले असून, या बससेवेचा लोकार्पण सोहळा शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी आमदार खोतकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



जालना शहराची वाढती लोकसंख्या, शहराच्या विविध भागांत वाढलेली दैनंदिन वर्दळ आणि नागरिकांची सार्वजनिक वाहतुकीवरील वाढती गरज लक्षात घेऊन शहरातील बससेवा अधिक सक्षम करण्याची मागणी सातत्याने पुढे येत होती. या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे जालना शहरासाठी स्वतंत्रपणे राजमाता जिजाऊ बस उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

खोतकर यांच्या मागणीची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक निर्णय घेतला आणि जालना शहरातील नागरिकांच्या सेवेसाठी ही बस उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे.

**नागरिक, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठांना मोठा दिलासा**

शहरातील विविध भागांत नोकरी, व्यवसाय, शिक्षण तसेच दैनंदिन *(पान २ वर)*

# संपादकीय...

## टेंभुर्णीच्या विकासाचा पैसा कागदावरच का?

ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाहीची सर्वात मूलभूत आणि प्रभावी व्यवस्था मानली जाते. गावातील नागरिकांना त्यांच्या गावाच्या विकासाबाबत प्रश्न विचारण्याचा, माहिती मागण्याचा आणि प्रशासनाला जाब विचारण्याचा अधिकार ग्रामसभेमुळे मिळतो. टेंभुर्णी येथे झालेली अलीकडची ग्रामसभा या अर्थाने केवळ नियमित प्रशासकीय बैठक राहिली नाही; उलट गावाच्या विकासाच्या दाव्यांवरच ग्रामस्थांनी उपस्थित केलेले गंभीर प्रश्न ही या ग्रामसभेची खरी ओळख ठरली.

गावाच्या विकासासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध झाल्याचे विविध माध्यमांतून आणि संबंधित विकास निधीच्या नोंदींमधून दिसत असेल, तर त्याचा प्रत्यक्ष परिणाम गावाच्या रस्त्यांवर, नाल्यांवर, पाणीपुरवठ्यावर, स्वच्छतेवर, पथदिव्यांवर आणि सार्वजनिक सुविधांवर दिसायला हवा. मात्र, निधी उपलब्ध असल्याचे कागद सांगतात आणि गावातील परिस्थिती वेगळेच चित्र दाखवत असेल, तर या दोन चित्रांमधील दरी स्पष्ट करणे ही ग्रामपंचायतीची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी आहे. याचा अर्थ निधीचा गैरवापर झाला आहे, असा निष्कर्ष तातडीने काढणे योग्य ठरणार नाही. मात्र, निधी कुठून आला, कोणत्या कामासाठी मंजूर झाला, किती खर्च झाला, कोणत्या संस्थेमार्फत काम झाले, काम पूर्ण झाले की नाही आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ ग्रामस्थांना मिळाला का, या प्रश्नांची उत्तरे सार्वजनिक होणे अत्यावश्यक आहे.

सात लाखांची व्यायामशाळा : प्रश्न केवळ इमारतीचा नाही

ग्रामसभेत चर्चेत आलेला व्यायामशाळेचा मुद्दा याच पारदर्शकतेचा केंद्रबिंदू ठरतो. सात लाख रुपये खर्च झाल्याचे सांगितले जात असेल आणि प्रत्यक्षात व्यायामशाळा कुठे आहे, असा प्रश्न युवकांना पडत असेल, तर त्याचे उत्तर कागदपत्रांसह मिळायला हवे. व्यायामशाळा बांधण्यासाठी निधी मंजूर झाला असेल तर त्याचा मंजुरी आदेश, अंदाजपत्रक, कार्यादेश, कामाची मोजमाप पुस्तिका, देयके आणि पूर्णत्वाचा दाखला यांची माहिती ग्रामस्थांसमोर ठेवणे कठीण नसावे. काम झाले असेल तर ते प्रत्यक्ष दाखवावे; काम झाले नसेल तर निधीची स्थिती स्पष्ट करावी. गावाच्या तरुणांनी प्रश्न विचारणे ही प्रशासनासाठी अडचण नसून लोकशाहीच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे. ‘निधी किती?’पेक्षा ‘काम किती?’ हा खरा प्रश्न आज ग्रामीण विकासाच्या चर्चेत निधीच्या आकड्यांना मोठे महत्त्व दिले जाते. कोट्यवधींच्या योजना, लाखो रुपयांची कामे, विविध योजनांच्या घोषणाहे सर्व ऐकायला आकर्षक वाटते. पण सामान्य नागरिकासाठी विकासाची खरी व्याख्या वेगळी आहे. त्याला चांगला रस्ता हवा आहे. नाल्यात साचलेले पाणी नको आहे. नळाला नियमित पाणी हवे आहे. रात्री रस्त्यावर पथदिवा हवा आहे. महिलांसाठी स्वच्छतागृह हवे आहे.

मुलांसाठी सुरक्षित सुविधा हव्यात. म्हणूनच विकासाचा खरा मापदंड मंजूर निधी नसून पूर्ण झालेली आणि वापरात असलेली कामे हा असला पाहिजे. खडकपूर्णा पाणीपुरवठा योजना : आश्वासनांचा अंत कधी? टेंभुर्णीतील खडकपूर्णा पाणीपुरवठा योजनेचा मुद्दाही तितकाच गंभीर आहे. पाईपलाईन अपूर्ण असल्याची तक्रार ग्रामस्थांकडून केली जात असेल आणि नागरिकांना आजही नियमित पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर या योजनेचा कालबद्ध आढावा घेण्याची गरज आहे. योजनेसाठी किती निधी मंजूर झाला? किती खर्च झाला? किती काम पूर्ण झाले? उर्वरित काम कधी पूर्ण होणार? गावाला नियमित पाणीपुरवठा नेमका कधी सुरू होणार?

या प्रश्नांना ‘लवकरच होईल’ या पारंपरिक उत्तरापेक्षा निश्चित तारीख आणि जबाबदार यंत्रणेचे नाव अपेक्षित आहे.

ग्रामसभेत ४२ मुद्दे; याचा अर्थ प्रशासनाने आत्मपरीक्षण करावे एका ग्रामसभेत तब्बल ४२ प्रश्न उपस्थित होणे ही केवळ प्रश्नांची संख्या नाही. ती गावातील नागरिकांच्या अस्वस्थतेची पातळी दर्शवते. रस्ते, नाल्या, पाणी, बसस्थानक, स्वच्छतागृहे, पथदिवे, अतिक्रमण, बाजारातील अस्वच्छता, बँका, पोस्ट ऑफिस, एसटी बस, दारू दुकाने, ग्रामपंचायत कार्यालय, पाळणाघर आणि विकास निधीप्रश्नांची व्याप्ती पाहिली तर टेंभुर्णीसमोरची आव्हाने सर्वसमावेशक आहेत.

यातील प्रत्येक प्रश्न स्वतंत्रपणे सोडविण्याची आवश्यकता असली तरी त्यामागे एक समान मुद्दा आहेगावाच्या नियोजनाचा अभाव. गाव वाढत आहे, लोकसंख्या वाढत आहे, बाजारपेठ विस्तारत आहे; मात्र पायाभूत सुविधा त्याच वेगाने वाढल्या आहेत का? हा प्रश्न ग्रामपंचायतीने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्नही गंभीर

ग्रामपंचायतीकडे विकासासाठी मोठ्या निधीच्या योजना येत असतील आणि त्याचवेळी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न निर्माण होत असेल, तर आर्थिक व्यवस्थापनाचा स्वतंत्रपणे आढावा घेणे गरजेचे आहे. ग्रामपंचायतीचा पैसा हा कोणाच्याही वैयक्तिक मालकीचा नसतो. तो जनतेच्या करातून, शासनाच्या निधीतून आणि विविध योजनांमधून आलेला सार्वजनिक पैसा असतो. त्यामुळे त्याच्या प्रत्येक रुपयाचा हिशेब देणे ही उपकाराची बाब नसून कर्तव्य आहे. महिलांचा सहभाग ही सकारात्मक बाब या ग्रामसभेत महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रश्न मांडले, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. पाणी, स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पथदिवे यांसारखे प्रश्न महिलांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेले आहेत. महिलांनी ग्रामसभेत आवाज उठवणे म्हणजे गावाच्या विकास प्रक्रियेत लोकसहभाग वाढत असल्याचे चिन्ह आहे. हा सहभाग केवळ एका ग्रामसभेपुरता मर्यादित न राहता महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजावर रचनात्मक पद्धतीने लक्ष ठेवण्याची गरज आहे. आता ‘सोशल मीडिया’ नव्हे, तर ‘सोशल ऑडिट’ची गरज टेंभुर्णीतील परिस्थितीत सर्वात महत्त्वाची गरज आहे ती सामाजिक लेखापरीक्षणाची. मागील पाच वर्षांतील प्रत्येक मोठ्या विकासकामाची माहिती ग्रामपंचायत कार्यालयाच्या भिंतीवर किंवा अधिकृत माध्यमातून सार्वजनिक करता येते. उदाहरणार्थ कामाचे नाव मंजूर निधी प्रत्यक्ष खर्च काम सुरू झाल्याची तारीख काम पूर्ण झाल्याची तारीख काम करणारी यंत्रणा/कंत्राटदार कामाची सद्यस्थिती ग्रामस्थांना झालेला प्रत्यक्ष लाभ ही माहिती सार्वजनिक झाली तर अनेक प्रश्नांची उत्तरे आपोआप मिळतील. ‘कुणावर आरोप करायचा?’ यापेक्षा ‘हिशेब कुठे आहे?’ हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

# पान १ व ४ वरुन...

### तलाव धोक्यात...

प्रलंबित कामांना गती द्यावी तसेच आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

जालना शहराच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित तलावाची सुरक्षितता, गाळ काढण्याचे काम आणि वाढीव पाणी साठवण क्षमता या बाबींकडे केवळ पावसाळ्यापुरते न पाहता दीर्घकालीन नियोजनातून पाहण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे शेतकरी कर्जमुक्ती योजनेत पात्र लाभार्थी कोणत्याही प्रशासकीय किंवा तांत्रिक अडथळ्यामुळे वंचित राहणार नाहीत, यासाठी शासनाने स्पष्ट व सुलभ कार्यपद्धती निश्चित करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**पत्रकार परिषदेला मान्यवरांची उपस्थिती**

या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेला श्री. राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, नंदू भैया जांगडे, कृष्णा पा. पडूळ, संजय मुथा, नरेंद्र मित्तल, सुनील चौधरी, अब्दुल हाफिज, संजय इंगळे, शेख वासिम, अशोकराव उबाळे, राजेंद्र गोरे, अविनाश चव्हाण, रघुवीर गुढे, सोपान तिरुखे, ज्ञानदेव इंगोले, वासिम पठाण, भागवत घाटे, कलीम खान, कल्याण तारडे आदी मान्यवर उपस्थित होते.

जालना शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या तलावाच्या सुरक्षिततेसाठी तातडीने तांत्रिक तपासणी, सांडव्यांची दुरुस्ती आणि गाळ काढण्याची कार्यवाही झाली, तर भविष्यातील संभाव्य धोके टाळण्यासोबतच शहराच्या पाणीपुरवठ्यालाही मोठा हातभार लागू शकतो. त्यामुळे या मागण्यांवर शासन आणि संबंधित प्रशासन कोणती कार्यवाही करते, याकडे आता जालना शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### तीव्र रक्तक्षयग्रस्त...

रक्तक्षयाच्या मातांना उपचार देण्यात आले आहेत. नागपूर, सिंधूदूर्ग, गोंदिया, छत्रपती संभाजीनगर, पुणे, हिंगोली, जालना, धाराशिव व ठाणे या जिल्ह्यांनी ९५ ते १०० टक्क्यांपर्यंत तीव्र रक्तक्षयाच्या मातांना उपचार देऊन साध्य पूर्ण केले आहे. ही कामगिरी राज्यातील मातृ आरोग्य यंत्रणेची तत्परता आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे शक्य होत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातही उपचार सेवा प्रभावीपणे पोहोचत आहे. लातूर, नाशिक, भिवंडी, कोल्हापूर, उल्हासनगर, नांदेड-वाघाळा, नवी मुंबई, सोलापूर, चंद्रपूर, परभणी व सांगली-मिरज कुपवाड या क्षेत्रांमध्ये उपचारांचे प्रमाण १०० टक्के आहे. इतर सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये पात्र मातांपर्यंत उपचार वेळेत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र पाठपुरावा करण्यात येत आहे. उपचारांचे प्रमाण तुलनेने कमी असलेल्या नंदुरबार, सोलापूर, गडचिरोली, पालघर, नाशिक आणि भंडारा या जिल्ह्यांसाठी विशेष कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. या भागांमध्ये जिल्हानिहाय उद्दिष्टे निश्चित करून आशासेविका, आरोग्यसेविका, वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत उपचार कव्हरेज वाढविण्यावर भर दिला जात आहे. शिवाय सार्वजनिक आरोग्य विभागाने तीव्र रक्तक्षय असलेल्या सर्व गर्भवती महिलांना त्यांच्या हिमोग्लोबिनची पातळी वाढविण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आयर्न सुक्रोज/फेरिक कार्बोक्सि माल्टोज इंजेक्शन देण्यासाठी जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ अखेर विशेष मोहीम राबविली आहे. गरोदर मातांवर रक्तक्षयाचे उपचार नेहमी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीच करावी लागतात.

गर्भधारणेची नोंद होताच प्रत्येक महिलेची हिमोग्लोबिन तपासणी, आयर्न-फॉलिक ॲसिडच्या नियमित सेवनाबाबत समुपदेशन, पोषक व लोहयुक्त आहाराची माहिती आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञांकडे संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. एचएमआयएस अहवालाच्या माध्यमातून जिल्हा व तालुकानिहाय तपासणी, निदान आणि उपचाराच्या प्रगतीचे नियमित विश्लेषण केले जात आहे.

*आयर्न सुक्रोजचे / फेरिक कार्बोक्सि माल्टोज इंजेक्शनचे फायदे* * रक्तातील हिमोग्लोबिन आणि शरीरातील लोहाचा साठा वेगाने वाढवण्यास मदत होते.

* रक्तातील ऑक्सिजनचा पुरवठा सुधारल्याने ऊर्जा मिळते. मरगळ व थकवा कमी होतो.

* तोंडाव्दारे देण्यात आलेल्या आयर्न (लोहयुक्त) गोळ्यांमुळे होणारा मळमळ किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास या इंजेक्शनमुळे टाळता येतो. * गर्भधारणा व किडनीच्या आजारात याचा उपयोग चांगला होत आहे. तीव्र अशक्तपणा किंवा दीर्घकालीन मूत्रपिंडाच्या आजाराच्या () समस्या असलेल्या महिलांवर उपचारासाठी आयर्न सुक्रोज फायदेशीर आहे.

* या उपचार पद्धतीमुळे हिमोग्लोबिनची पातळी वाढवून अकाली प्रसूती, प्रसूती दरम्यान/नंतर रक्तस्त्राव, माता मृत्यू यासारख्या समस्या कमी होण्यास मदत होते.

### जालन्याच्या...

कामानिमित्त ये-जा करणाऱ्या नागरिकांसाठी सार्वजनिक बससेवा महत्त्वाची ठरते. विशेषतः विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रोजच्या प्रवासावर अवलंबून असलेल्या नागरिकांना या नव्या बससेवेचा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्याने खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होण्यासही मदत होऊ शकते. त्याचबरोबर नागरिकांना तुलनेने परवडणाऱ्या दरात शहरांतर्गत प्रवासाची सुविधा मिळणार असल्याने या बससेवेकडे जालना शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

**‘ई-बसेस’साठीही पाठपुरावा सुरू**

लोकार्पण सोहळ्यादरम्यान आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना शहराला भविष्यात अधिकाधिक आधुनिक ई-बसेस मिळाव्यात, यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे स्पष्ट केले. लोकार्पण सोहळ्यानंतर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत जालना बसस्थानक ते भोकरदन चौकापर्यंत राजमाता जिजाऊ बसमधून प्रवास केला.

या प्रवासादरम्यान त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि प्रवासाशी संबंधित अनेक अनुभव उपस्थितांशी शेअर केले. आमदारांनी स्वतः बसमधून प्रवास केल्याने उपस्थित कार्यकर्ते आणि नागरिकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जालना शहराच्या विकासाच्या विविध प्रश्नांसोबतच नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. जालना शहरासाठी आधुनिक ई–बसेस उपलब्ध करून देण्याचा पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार खोतकर यांनी जाहीर केल्याने आगामी काळात शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आणखी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

प्रदूषण कमी करणे, प्रवास अधिक आरामदायी करणे आणि सार्वजनिक वाहतुकीकडे नागरिकांचा कल वाढविणे या दृष्टीने आधुनिक बससेवा उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे जालना शहरासाठी भविष्यात किती ई–बसेस उपलब्ध होतात आणि त्यांचे मार्ग कोणते असतील, याकडे नागरिकांचे लक्ष राहणार आहे.

लोकार्पण सोहळ्यास शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, नगरसेविका दर्शना झोल–खोतकर, मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक अश्विन आंबेकर, संजय डुकरे पाटील, अमोल ठाकूर, दीपक राठोड, नितीन जांगडे, सपकाळ मॅडम (डी.सी.), जफर खान, संतोष रासवे, स्वप्नील भास्कर, अजिंक्य जैवळ, बसस्थानक प्रमुख अनिल राठोड, सरफराज खान, शेख मुजाहेद, अभिषेक काबलिये, नजीर शेख, अच्युतराव कदम, देवेंद्र बुंदेले, धनराज बटावाले, आकाश जगताप, अंकुश पाचफुले, अमोल राऊत, मनोज लाखोले, बिलाल सौदागर आदींसह जालना आगारातील अधिकारी, कर्मचारी आणि शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजमाता जिजाऊ बसच्या माध्यमातून जालना शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत झालेली ही भर नागरिकांसाठी कितपत प्रभावी ठरते, हे प्रत्यक्ष सेवेतून स्पष्ट होणार असले तरी आधुनिक ई–बसेससाठी आमदार खोतकरांनी जाहीर केलेला पुढील पाठपुरावा शहराच्या वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

### ‘बटन गोळ्या...

सदर बाजार पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ६९३/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्यावर कलम १२३, २७८ भारतीय न्याय संहिता तसेच कलम ८(क), २२(अ) एनडीपीएस कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

**तपासात पुरवठा साखळीचा उलगडा**

प्राथमिक कारवाईनंतर पोलिसांनी या प्रतिबंधित गोळ्यांचा पुरवठा नेमका कोठून होत होता, याचा तपास सुरू केला. तपासादरम्यान या औषधांच्या पुरवठा साखळीतील आणखी तीन व्यक्तींची नावे समोर आली.

पोलिसांनी सय्यद युसुफ अली सय्यद अली (वय ४४, रा. रांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना), शिवप्रसाद संतोष बडदमकर (वय २२, रा. सुंद्राईनगर, उघडा महादेव मंदिराजवळ, परभणी) आणि शेख अलीम शेख इस्माईल (वय २७, रा. अपना कॉर्नर, शालीमार, परभणी) यांना परभणी शहरातून ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान गुन्ह्यातील त्यांचा सहभाग निष्पन्न झाल्यानंतर तिन्ही संशयितांना या प्रकरणात अटक करण्यात आली. अशाप्रकारे या प्रकरणातील आरोपींची संख्या चार झाली आहे.

**न्यायालयाकडून १ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी**

चारही आरोपींना अटक केल्यानंतर पोलीस कस्टडी रिमांडसह न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपींना दि. १ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

या कालावधीत प्रतिबंधित गोळ्यांचा पुरवठा कुठून केला जात होता, या टोळीतील आणखी कोण व्यक्ती सहभागी आहेत, गोळ्यांची विक्री कोणत्या परिसरात केली जात होती आणि या साखळीचे जाळे आणखी किती जिल्ह्यांपर्यंत पसरले आहे, याचा तपास पोलीस करीत आहेत.

**२०२६ मध्ये अमली पदार्थांविरोधात ३८ गुन्हे**

दरम्यान, जालना पोलिसांनी सन २०२६ मध्ये अमली पदार्थांचे सेवन तसेच अमली पदार्थ बाळगणाऱ्या व्यक्तींविरुद्ध आतापर्यंत ३८ गुन्हे दाखल केले आहेत. या कारवायांमध्ये एकूण १६ लाख ६० हजार ४२२ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

यावरून जिल्ह्यात अमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांकडून कारवाईची मोहीम अधिक तीव्र करण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. विशेषतः तरुणांमध्ये व्यसनाधीनता वाढविणाऱ्या पदार्थांच्या पुरवठ्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांनी विक्रेते, पुरवठादार आणि वितरण साखळीवर लक्ष केंद्रित केले आहे.

**पुरवठा साखळीचा तपास महत्त्वाचा**

‘बटन गोळ्या’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुंगीकारक औषधांचा गैरवापर आरोग्यासाठी गंभीर ठरू शकतो. त्यामुळे अशा औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे. या प्रकरणात एका व्यक्तीकडून ६६०० गोळ्यांचा साठा मिळाल्यानंतर त्याचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तींपर्यंत पोलिसांनी तपास पोहोचविला आहे.

आता पोलीस कोठडीच्या काळात या टोळीचे आणखी धागेदोरे हाती लागतात का, या औषधांचा मुख्य पुरवठादार कोण आहे आणि जालना, बीड व परभणीपलीकडे या साखळीचे जाळे विस्तारले आहे का, याचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, सफौ. सॅम्युअल कांबळे तसेच पोलीस अंमलदार रमेश राठोड, रुस्तुम जैवाळ, विजय डिक्कर, प्रभाकर वाघ, इरशाद पटेल, अक्रूर धांडगे, प्रदीप करतारे, चालक गणपत पवार, सुनील पवार, अशोक जाधवर आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

प्रतिबंधित गुंगीकारक औषधांच्या विक्रीविरोधात जालना पोलिसांनी सुरू केलेली ही कारवाई आगामी काळात आणखी तीव्र होण्याची चिन्हे असून, या प्रकरणाच्या तपासातून अंतरजिल्हा पुरवठा साखळीतील आणखी आरोपी समोर येतात का, याकडे लक्ष लागले आहे.

### संस्कृत भाषेच्या...

असून त्यातील कादंबरी, कथा, आत्मचरित्र ही ग्रंथ संपदा पाहून मन प्रसन्न झाले. रीमा खरात मनोगत व्यक्त करतांत म्हणाल्या कि, विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेच्या अभ्यासासोबत ग्रंथालयातील ग्रंथाचे देखिल वाचन करावे कारण ग्रंथ वाचनाने आपले मस्तक घडते.

माझे इयत्ता आठवी ते दहावी पर्यंत संस्कृत होते त्यामुळे मला संस्कृतचे काही श्लोक आजही पाठ आहेत. पण त्यानंतर संस्कृत विषय घेता न आल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. संस्कृत भाषेमध्ये थोड्या शब्दांमध्ये खूप अर्थ सांगता येतो. आई-वडील आपल्यासाठी किती कष्ट करतात हे पाहूण विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा कारण केलेले वाया जात नाही. संस्कृत सारखी समृध्द भाषा बऱ्याच शाळेत शिकवत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ग्रंथालयातील ग्रंथांचा खजिना पाहूण ग्रंथालय मोठे करण्यासाठी मी प्रयत्न करेल. इयत्ता बालक मंदिर,१ ली व २ री मधील संस्कृत स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त १७ व इयत्ता ९ वी व १० वी च्या ०९ विद्यार्थांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. यावर्षी एकूण ३०४ विद्यार्थांनी स्पर्धेत सहभाग घेतला तर एकूण ६२ विद्यार्थांनी परितोषिके देण्यात आली. भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारणी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल संध्या देठे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार जयश्री कुलकर्णी यांनी मानले. याप्रसंगी सुधाकर वाहेगावकर,श्रीकांत शेलगावकर,कल्याणी कुलकर्णी,सुर्यकांत रत्नपारखी,सुमित कुलकर्णी,कीर्ती शेलगावकर,मनोहर कुलकर्णी,संदीप नेरकर,अमोल कुलकर्णी,मीरा बोधे, शैलेन्द्र बदनापुरकर, रेणुका गुलापेल्ली यासह पालक,संस्कृत शिक्षक,वाचक वर्ग उपस्थित होता.

### जालना जिल्ह्यात...

केंद्रे सध्या नियमित कर्मचाऱ्यांविना सुरू आहेत आणि त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था काय आहे, याची प्रशासनाने तातडीने माहिती जाहीर करावी, अशी मागणी होत आहे. तसेच पात्र महिलांना भरती प्रक्रियेत समान संधी मिळावी, वयोमर्यादा व इतर पात्रता निकष स्पष्टपणे जाहीर करावेत, अर्ज प्रक्रियेत कोणताही संभ्रम राहू नये आणि पात्र उमेदवारांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, अशीही मागणी केली जात आहे. बालकांच्या हितासाठी निर्णयाची गरज अंगणवाडी केंद्रांचा थेट संबंध बालकांच्या पोषण, आरोग्य आणि पूर्व प्राथमिक शिक्षणाशी असल्याने रिक्त पदांचा प्रश्न केवळ रोजगाराचा नसून बालकांच्या मूलभूत सेवांशी संबंधित आहे. त्यामुळे जालना जिल्हा प्रशासन आणि महिला व बाल विकास विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून सर्व रिक्त पदांचा आढावा घ्यावा आणि पात्रतेनुसार पारदर्शक पद्धतीने भरती प्रक्रिया राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ‘‘जिल्ह्यातील एकही अंगणवाडी सेविका किंवा मदतनीस पद रिक्त राहू नये आणि पात्र महिलांना नियमांनुसार संधी मिळावी,’’ अशी मागणी आता जोर धरत आहे. प्रशासनाने स्पष्ट करावे जालना जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांची एकूण मंजूर पदे किती? त्यापैकी किती पदे रिक्त आहेत? किती केंद्रे सध्या सेविका किंवा मदतनीसांविना कार्यरत आहेत? रिक्त पदांची भरती कधीपर्यंत पूर्ण होणार? तसेच वयोमर्यादेमुळे संधी गमावणाऱ्या उमेदवारांच्या तक्रारींबाबत प्रशासनाची भूमिका काय? या सर्व प्रश्नांची स्पष्ट माहिती प्रशासनाने जनतेसमोर ठेवणे गरजेचे आहे.

जालना जिल्ह्यातील अंगणवाडी भरतीचा प्रश्न आता प्रशासनाच्या दारात पोहोचला असून, याबाबत तातडीने निर्णय होणार का, याकडे जिल्ह्यातील महिला उमेदवारांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### मत्स्योदरी...

डॉ. एस. के. बिरादार होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता स्वतःच्या क्षमता, कौशल्ये व आत्मविश्वासाचा विकास करून भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना अविनाश दवणे, प्रभारी, पॉलिटेक्निक यांनी केली. सूत्रसंचालन प्रा. सतीश दिघुळे यांनी, तर आभार प्रा. प्रवीण भाकडे यांनी मानले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. आकाश दिवटे, प्रा. खरात व रेड्डी मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या या कार्यशाळेमुळे त्यांना सकारात्मक विचारसरणी, आत्मविश्वास आणि योग्य करिअर नियोजनाची दिशा मिळाली.

### विद्यार्थ्यांचे शैक्षणिक...

शैक्षणिक नुकसान होत आहे. २)शासन आदेशाप्रमाणे हे काम इतर विभागाच्या कर्मचाऱ्यांकडे सोपवण्यात यावे. ३)विद्यार्थ्यांचे भविष्य आणि दर्जेदार शिक्षणासाठी शिक्षकांना फक्त अध्यापनाचे काम करू द्यावे.

### प्रेषित मुहम्मद...

जमीयत उलेमा तालुका परतूरचे अध्यक्ष मौलाना मुफ्ती अब्दुल कदीर कासमी होते.

कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून मौलाना कारी शम्सुद्दीन, नाजिम मदरसा अबी-बिन काआब, आष्टी तालुका परतूर; मदरसा रौजतुल उलूमचे सचिव, अय्यूब खान पठाण, मौलाना मुफ्ती सुहेल कासमी मेवाती आणि मौलाना मुफ्ती मुरसलीन कासमी मेवाती आदींची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून मौलाना अकील कासमी कुरेशी, इमाम मस्जिद रेल्वे स्टेशन परतूर; हाफिज मुहम्मद हारून, इमाम मस्जिद हाशमिया परतूर; हाफिज मुजफ्फर मिल्ली, शहराध्यक्ष जमीअत उलेमा परतूर. ज्येष्ठ पत्रकार हाफिज मुहम्मद लायेक कुरेशी. महमूद सर; डॉ. तकियुद्दीन सिद्दीकी; जावेद खान पठाण; मोहसीन खान पठाण; पत्रकार मुश्ताक देशमुख; अल्हाज नबी साहेब देशमुख; परवेज देशमुख; गौस देशमुख; शेख सलीम साहेब आणि फारूक आलम कादरी यांची उपस्थिती होती. तसेच परतूर शहरातील अनेक उलेमा व हाफिज-ए-कुरआन यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

कार्यक्रमाची सुरुवात कुरआन शरीफच्या पठणाने आणि नात-ए-रसूल स. ने झाली. कुरआनाचे पठण मौलाना मुफ्ती मुरसलीन आणि हाफिज हारून यांनी केले. नबी पाक स. यांच्या सेवेत नातिया कलाम प्रतिभावान विद्यार्थी अब्दुल्ला सिद्दीकी आणि जाकीर खान सर यांनी सादर केले. मस्जिद महबूबिया मकतब मध्ये शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थिनींनी ही नातिया कलाम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमाची उद्दिष्ट, तसेच उपस्थित उलेमांचा परिचय ज्येष्ठ पत्रकार हाफिज मुहम्मद लायेक कुरेशी यांनी करून दिला. यावेळी मौलाना अकील कुरेशी, मौलाना कारी शम्सुद्दीन, मौलाना मुफ्ती सुहेल कासमी मेवाती, मौलाना मुफ्ती मुरसलीन कासमी मेवाती, तसेच मदरसा रौजतुल उलूम व मौलाना मुहम्मद अली जौहर प्राथमिक शाळेचे संस्थापक-सचिव अय्यूब खान यांनी सीरत-ए-नबीच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच अध्यक्षीय समारोपाच्या मार्गदर्शन करताना मौलाना मुफ्ती अब्दुल कदीर कासमी यांनी मुस्लिम समाजाला आवाहन केले की, प्रेशीत मुहम्मद स यांच्या पवित्र जीवनाचा आदर्श स्वीकारून जीवन जगावे आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या सुन्नतींचे पालन करावे. सीरत-ए-नबी केवळ रबीउल अव्वल किंवा ईद-ए-मिलादुन्नबी पुरती मर्यादित नसून सीरतचा व्यापक अर्थ असून तो प्रत्येक मुस्लिमाच्या संपूर्ण जीवनाशी जोडलेला आहे. सीरत-ए-नबीचा संदेश देशातील सर्व समाज बांधवांपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार हाफिज मुहम्मद लायेक कुरेशी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार हाफिज अल्ताफ अहमद, इमाम मस्जिद महबूबिया यांनी मानले. दूरवरून प्रवासातील अडचणी सहन करून परतूर येथे उपस्थित राहिलेल्या सर्व उलेमांचे त्यांनी विशेष आभार मानले. अशा ज्येष्ठ उलेमांची उपस्थिती ही परतूर शहरासाठी अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मस्जिद व्यवस्थापन समितीचे अल्हाज सय्यद जहूर अली, अल्हाज सय्यद कमर अली, सय्यद मुक्तदिर अली, सय्यद जुनैद अली, सय्यद इरफान अली, सय्यद फजल अली, सय्यद अझहर अली, अल्हाज सय्यद हामिद अली तसेच नवयूवक तरूण,आणि मस्जिद मध्ये नमाज अदा करणाऱ्या भाविकांनी विशेष परिश्रम घेत उत्कृष्ट व्यवस्था केली.

शेवटी मौलाना मुफ्ती अब्दुल मुकतदिर कासमी, प्रदेशाध्यक्ष मजलिस-ए-अहरार इस्लाम, महाराष्ट्र यांच्या दुआने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद!

आज २९ ऑगस्ट. भारतीय हॉकीचे महान खेळाडू आणि आपल्या अद्वितीय खेळाने जगभरात भारताची ओळख निर्माण करणारे मेजर ध्यानचंद यांची आज जयंती. त्यांच्या जन्मदिनी देशभर राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. भारतीय क्रीडा क्षेत्रातील या महान व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्वाला अभिवादन करण्याचा आणि नव्या पिढीला त्यांच्या जीवनातून प्रेरणा देण्याचा हा दिवस आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशातील उल्लेखनीय क्रीडापटू, प्रशिक्षक आणि क्रीडा क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तींचा विविध राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांनी गौरव केला जातो. भारताचा सर्वोच्च क्रीडा सन्मान असलेल्या मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराचे नावही त्यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आले आहे. अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार आणि मेजर ध्यानचंद पुरस्कार यांसारख्या सन्मानांमधूनही भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित होते.

२९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तर प्रदेशातील तत्कालीन अलाहाबाद येथे ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील समेश्वर दत्त हे ब्रिटिश भारतीय सैन्यात कार्यरत होते. वडिलांच्या नोकरीमुळे कुटुंबाला विविध ठिकाणी राहावे लागले. वयाच्या सोळाव्या वर्षी, १९२२ मध्ये ध्यानचंद भारतीय सैन्यात दाखल झाले. सैन्यात असतानाच त्यांच्या हॉकी कारकिर्दीला सुरुवात झाली. हॉकीतील त्यांची असामान्य प्रतिभा ओळखून त्यांना मार्गदर्शन करणारे मेजर बाले तिवारी हे त्यांचे महत्त्वाचे गुरू मानले जातात. त्यांनी ध्यानचंद यांना हॉकीतील बारकावे, खेळातील शिस्त आणि तंत्र समजावून दिले. त्यानंतर ध्यानचंद यांनी हॉकीलाच आपले जीवन समर्पित केले.

१९२६ मध्ये न्यूझीलंड दौऱ्यावर गेलेल्या भारतीय लष्करी हॉकी संघात ध्यानचंद यांची निवड झाली. या दौऱ्यात त्यांनी आपल्या अप्रतिम खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या कामगिरीमुळे भारतीय हॉकीची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा वाढली आणि ध्यानचंद यांच्या कारकिर्दीला नवी दिशा मिळाली.

ध्यानचंद यांच्या खेळाची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे चेंडूवरील विलक्षण नियंत्रण, अचूक पासिंग, वेग, मैदानावरील परिस्थितीचा अचूक अंदाज आणि गोल करण्याची अफाट क्षमता. त्यांच्या स्टिकवर चेंडू जणू काही चिकटूनच राहतो, असे त्यांच्या खेळाकडे पाहताना वाटत असे. त्यामुळे त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक बसवले असल्याच्या आख्यायिका त्या काळात प्रसिद्ध झाल्या. प्रत्यक्षात ही त्यांच्या असामान्य कौशल्याची लोकप्रिय उपमा होती.

ध्यानचंद यांचा खेळ केवळ वैयक्तिक कौशल्यापुरता मर्यादित नव्हता. हॉकी हा सांघिक खेळ आहे आणि संघभावनेला सर्वाधिक महत्त्व दिले पाहिजे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे योग्य वेळी सहकाऱ्यांना अचूक पास देणे आणि संघाच्या विजयाला प्राधान्य देणे ही त्यांच्या खेळाची खास वैशिष्ट्ये होती. त्यांच्या याच विलक्षण कौशल्यामुळे त्यांना 'हॉकीचे जादूगार' ही उपाधी मिळाली.

१९२८ च्या ॲमस्टरडॅम ऑलिम्पिकमध्ये भारताने हॉकीचे सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर १९३२ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्येही भारताने सुवर्णपदक पटकावले. १९३६ च्या बर्लिन ऑलिम्पिकमध्येही भारतीय संघाने सुवर्णपदक जिंकत सलग तिसऱ्यांदा ऑलिम्पिक हॉकीत आपले वर्चस्व सिद्ध केले. या तिन्ही सुवर्णपदकांच्या यशात ध्यानचंद यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. त्यामुळे भारतीय हॉकीच्या सुवर्णयुगाचे ते प्रमुख शिल्पकार ठरले.

१९३६ च्या बर्लिन ऑलिम्पिकच्या अंतिम सामन्यात भारताने जर्मनीचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. या सामन्याला तत्कालीन जर्मन हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलर उपस्थित असल्याचे ऐतिहासिक संदर्भांमध्ये नमूद केले जाते. ध्यानचंद यांच्या खेळाने हिटलर प्रभावित झाल्याच्या अनेक कथा लोकप्रिय आहेत. मात्र हिटलरने त्यांना जर्मन नागरिकत्व किंवा उच्च लष्करी पद देण्याची ऑफर केली होती, हा दावा ठोस ऐतिहासिक पुराव्यांपेक्षा लोकप्रचलित कथनाचा भाग अधिक मानला जातो. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाचे वर्णन करताना अशा दाव्यांकडे विवेकाने पाहणे आवश्यक आहे.

ध्यानचंद यांच्या खेळामुळे भारतीय हॉकीला जगभर मोठी प्रतिष्ठा मिळाली. भारतीय संघाचा खेळ पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी होत असे. मैदानावर त्यांचा चेंडूवरील ताबा, प्रतिस्पर्ध्यांना चकवण्याची शैली आणि गोल करण्याची हातोटी पाहून प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध होत. त्यांनी हॉकीच्या माध्यमातून भारताच्या क्रीडा सामर्थ्याची जगाला ओळख करून दिली. १९५६ मध्ये ध्यानचंद भारतीय सैन्यातून निवृत्त झाले. त्याच वर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण या सन्मानाने गौरविले. निवृत्तीनंतरही त्यांनी हॉकीशी असलेले नाते तोडले नाही. प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना मार्गदर्शन केले आणि पुढील पिढीतील खेळाडू घडविण्यासाठी आपले योगदान दिले. ३ डिसेंबर १९७९ रोजी या महान हॉकीपटूचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली; मात्र त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा भारतीय क्रीडा इतिहासावर कायमचा उमटला. मेजर ध्यानचंद यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतेप्रतिभेला कठोर परिश्रमाची जोड, खेळाला शिस्तीची साथ आणि वैयक्तिक यशाला संघभावनेची जोड मिळाली तरच खरे महानत्व प्राप्त होते. त्यांनी आपल्या खेळातून देशप्रेम, शिस्त, नम्रता आणि संघभावनेचा आदर्श घालून दिला.

आज २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करताना केवळ ध्यानचंद यांच्या कर्तृत्वाचे स्मरण करून चालणार नाही, तर देशातील प्रत्येक मुलाला आणि तरुणाला खेळाची संधी, योग्य प्रशिक्षण आणि आवश्यक सुविधा मिळतील यासाठीही प्रयत्न झाले पाहिजेत. खेळाडू घडविणे म्हणजे केवळ पदके मिळविणे नव्हे; तर निरोगी, शिस्तप्रिय आणि आत्मविश्वासू पिढी घडविणे होय.

हॉकीच्या मैदानावर आपल्या जादुई कौशल्याने भारताचे नाव जगभर पोहोचविणाऱ्या या महान खेळाडूला राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विनम्र अभिवादन!

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद अमर राहोत!

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पायी जाणाऱ्या दिंडीतील भाविकांसाठी फराळ वाटप

**दत्ता देशमुख**

गणेशपूर टेंभुर्णी येथून शेगाव नगरीकडे पायी जाणाऱ्या श्री संत गजानन महाराज यांच्या दिंडीतील भाविकांसाठी हॉटेल राधिकाचे संचालक सोमीनाथ अंधारे यांच्या वतीने भक्तीभावाने फराळ वाटप करण्यात आले गजानन महाराजांच्या जयघोषात माऊलींच्या पालखीचे आणि पायी दिंडीचे परिसरात आगमन झाले. हॉटेल राधिकाचे संचालक सोमीनाथ अंधारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्व वारकरी व भाविकांचे मनापासून स्वागत करून त्यांना ताजी व सकस फराळ पाकिटे वाटली. पायपीट करणाऱ्या वारकऱ्यांना या उपक्रमामुळे



मोठा दिलासा मिळाला असून, अंधारे परिवाराच्या या सामाजिक व धार्मिक कार्याचे परिसरात कौतुक होत आहे.या सेवाकार्यात हॉटेल राधिकाचे प्रतिनिधी, स्थानिक नागरिक आणि दिंडीचे प्रमुख सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. **वारकरी शेगावकडे जात असताना अत्यंत कठीण परिस्थितीत पायपीट करतात. अशा वेळी त्यांना ऊर्जा आणि विसावा मिळावा, या उद्देशाने आम्ही या छोट्याशा सेवाकार्याचे आयोजन केले. संतांच्या चरणी ही आमची भक्तीभावाने केलेली सेवा असून, भविष्यातही हा उपक्रम आम्ही असाच सुरू ठेवणार.**

## आ. अर्जुन खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

# भोकरदन चौफुली उड्डाणपुलालगतच्या दोन्ही सर्व्हिस रोडसाठी ₹८.८८ कोटी मंजूर

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरालगतच्या देऊळगाव राजाजालनाछत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावरील भोकरदन चौफुली येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंच्या सर्व्हिस रोडच्या सुधारणा कामासाठी ₹८ कोटी ८८ लाख ५३ हजार ३२४ रुपयांची (जीएसटी वगळून) प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी प्रत्यक्ष पाहणीपासून प्रस्ताव तयार करून घेणे, अधिकाऱ्यांच्या बैठका घेणे आणि केंद्रीय स्तरावर मंजुरी मिळविणे या प्रत्येक टप्प्यावर केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला आहे.

भोकरदन चौफुलीवरील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंच्या सर्व्हिस रोडची अत्यंत दुरवस्था झाल्याने वाहनचालक आणि परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. खड्डे, धूळ आणि वाहतुकीची कोंडी यांमुळे अपघाताचा धोकाही वाढला होता. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार खोतकर यांनी स्वतः रस्त्याची पाहणी केली आणि तातडीने डागडुजी करून वाहनधारकांना तात्पुरता दिलासा मिळवून दिला.

केवळ तात्पुरत्या दुरुस्तीवर न थांबता या सर्व्हिस रोडची कायमस्वरूपी सुधारणा व्हावी, यासाठी आमदार खोतकर यांनी राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोलाच्या अधिकाऱ्यांना तातडीने सविस्तर प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दिले.

राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष शेलार आणि कार्यकारी अभियंता अविनाश चव्हाण यांच्यासोबत त्यांनी वेळोवेळी बैठका घेऊन प्रस्तावाच्या प्रगतीचा सातत्याने आढावा घेतला.

आमदार खोतकर यांच्या पाठपुराव्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाने सुधारणा कामाचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडे सादर केला. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांनी या मागणीला तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव मंजूर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार कामासाठी ₹८ कोटी ८८ लाख ५३ हजार ३२४ रुपयांची (जीएसटी वगळून) प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सध्या या कामाची निविदा प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. सर्व्हिस रोडचे काम पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीची कोंडी कमी होऊन वाहनचालकांना सुरक्षित आणि सुकर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

''भोकरदन चौफुली येथील सर्व्हिस रोडचा प्रश्न केवळ तात्पुरती डागडुजी करून सोडायचा नव्हता.

त्यामुळे प्रत्यक्ष पाहणीपासून अंदाजपत्रक, प्रस्ताव आणि मंजुरीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर सातत्याने पाठपुरावा केला. या कामासाठी तातडीने ₹८.८८ कोटींची मंजुरी दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे जालनेकरांच्या वतीने मनःपूर्वक आभार. निविदा प्रक्रिया पूर्ण करून गुणवत्तापूर्ण काम लवकर सुरू व्हावे, यासाठीही आमचा पाठपुरावा कायम राहील.

# जालना पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पोलिसांना बांधल्या राख्या; तालुका पोलीस ठाण्यात रक्षाबंधन उत्साहात संपन्न!

**दत्ता देशमुख**

जालना पब्लिक स्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आज जालना तालुका पोलीस ठाण्याला भेट देऊन कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस काकांना राख्या बांधल्या. शाळेच्या प्राचार्या श्रीमती कीर्ती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या आगळ्यावेगळ्या आणि कौतुकास्पद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसरात्र जनतेच्या सुरक्षेसाठी तैनात असणाऱ्या पोलिसांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या विशेष भेटीचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या शिक्षिका श्रीमती नेहा राठोड,



दिपाली हजारे व इतर शिक्षक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत विद्यार्थी पोलीस ठाण्यात पोहोचले. तेथे पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सर्व मुलांचे अतिशय उत्साहात स्वागत केले.

विद्यार्थ्यांनी अत्यंत आनंदाने पोलीस बांधवांच्या मनगटावर राखी बांधून, त्यांना पेढा भरवला व त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. आपल्या कुटुंबापासून दूर राहून सण-उत्सवाच्या काळातही ड्युटीवर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी हा क्षण अत्यंत भावूक करणारा ठरला. पोलिसांनीही या चिमुकल्यांना खाऊ आणि भेटवस्तू देऊन त्यांचे तोंड गोड केले, तसेच त्यांना नेहमी सुरक्षित राहण्याचा आणि चांगला अभ्यास करण्याचा सल्ला दिला.

याप्रसंगी पोलिसांनी विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याचे कामकाज कसे चालते, याबद्दल सोप्या भाषेत माहिती दिली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील पोलिसांबद्दलची भीती दूर होऊन एक मैत्रीचे नाते निर्माण होण्यास मदत झाली. शाळेच्या शिक्षकांनी, समाजाचे रक्षण करणाऱ्या या खऱ्या हिरोंना सन्मान देणे हे आमचे कर्तव्य असल्याचे सांगत पोलिसांचे आभार मानले.

# इंग्लिश वक्तृत्व स्पर्धेत अदिती राय प्रथम

**दत्ता देशमुख**

जिल्हा परिषद, पंचायत समिती जालना यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बिट लेव्हल इंग्लिश एलोक्युशन कॉम्पिटिशनमध्ये हिंदू समाज संस्था संचलित कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयाची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी



अदिती नीरज राय हिने प्रथम क्रमांक पटकावून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. ही स्पर्धा तीन गटांमध्ये घेण्यात आली होती. अदितीने आपल्या प्रभावी इंग्रजी वक्तृत्वाने परीक्षकांची मने जिंकत प्रथम क्रमांक मिळविला. तिची तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अदितीला या स्पर्धेसाठी विद्यालयातील शिक्षक संदीप इंगोले यांनी मार्गदर्शन केले. तिच्या या यशाबद्दल हिंदू समाज संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजीव देशपांडे, सचिव चंद्रशेखर वाघमारे, उपाध्यक्ष जगदीश बडवे, संचालक डॉ. विनायक दसरे, नितिन कोळेश्वर , रावसाहेब अवघड, भगवान धोत्रे, जुगलकिशोर भक्कड ,तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती. मीनाक्षी कुलकर्णी यांनी अदिती रायचे अभिनंदन करून तालुकास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

अदितीच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्गातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

# एचआयव्ही-एड्स जनजागृतीसाठी शाळेत मार्गदर्शन

**दत्ता देशमुख**

जालना: कै. बाबुराव जाफराबादकर माध्यमिक विद्यालय येथे जालना आरोग्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी एचआयव्ही-एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही-एड्सविषयी योग्य माहिती दिली .जालना ए.आर.टी. कार्यालयाचे समुपदेशक यांनी प्रतिबंधात्मक उपाय आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

यावेळी आरोग्य विभागातील आर .बी.सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही व एड्स या आजाराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. एचआयव्ही म्हणजे काय, एचआयव्ही संसर्ग आणि एड्स यातील फरक, एचआयव्हीचा प्रसार कोणत्या मार्गाने होतो तसेच कोणत्या गैरसमजांना बळी पडू नये, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना शास्त्रीय व सोप्या भाषेत माहिती दिली.

एचआयव्हीचा संसर्ग टाळण्यासाठी सुरक्षित आणि जबाबदार वर्तन, योग्य



आरोग्यविषयक माहिती, आवश्यक वैद्यकीय तपासणी तसेच समाजात एचआयव्हीबाधित व्यक्तींशी भेदभाव न करण्याचे आवाहन त्यांनी केले. एचआयव्ही स्पर्श, हस्तांदोलन, एकत्र बसणे, जेवण करणे किंवा सामान्य सामाजिक संपर्कातून पसरत नाही, त्यामुळे एचआयव्हीबाधित व्यक्तींविषयी भीती किंवा भेदभाव न ठेवता त्यांना आधार देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती एम. एस. कुलकर्णी होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक माहिती आत्मसात करून ती समाजातही पोहोचवावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप इंगोले यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही-एड्सविषयी असलेले गैरसमज दूर होऊन आरोग्यविषयक सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत झाली.

# बीटस्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दत्ता देशमुख**

जालना शहरातील प्रशाला मुलांची येथे दहा केंद्रांमध्ये प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांची बीटस्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत जिल्हा परिषद तसेच खासगी शाळांमधील तीनही गटांतील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतून तालुकास्तरीय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

आपापल्या केंद्रांवर प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी बीटस्तरावर प्रभावी इंग्रजी वक्तृत्व सादर केली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, उच्चार व इंग्रजी भाषेतील संवादकौशल्य पाहून



उपस्थित शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे कौतुक व अभिनंदन केले. इंग्रजी भाषेत उत्स्फूर्तपणे वक्तृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी उपस्थितांनी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले. गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली वि.सा.व्य. सी. बी. जाधव, कैलास गायकवाड, एस. यू. गायकवाड व प्रफुल्ल राजे यांच्या सहकार्याने स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले. जिल्हा परिषद प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती डॉ. मेहेत्रे यांनी सुंदर व्यवस्था करून दिल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.स्पर्धेच्या निकालामध्ये अ गटात राजेश अनिल जाधव व श्रेया अनिल भालसामिंद्र, ब गटात अक्सा शेख व कृष्णाई विकास नाईक, तर क गटात अदिती नीरज राय हिने प्रथम क्रमांक आणि भक्ती लोखंडे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांच्या स्पर्धेचे परीक्षण श्रीमती अख्तर कुरेशी, नंदा वालकट्टी व दीपाली बेहरे यांनी परीक्षक म्हणून केले.जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेविषयीची भीती दूर करून त्यांच्यामध्ये इंग्रजी भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी इंग्लिश टीचर्स फोरम सातत्याने प्रयत्नशील आहे.

# संस्कृत भाषेच्या अध्ययनाने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक उर्जा निर्माण होते-संध्या देठे






## संस्कृत स्पर्धेचा समारोप व संस्कृत दिन संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

संस्कृत भाषेच्या अध्ययनाने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक उर्जा निर्माण होऊन जिभेला वळल लागते व उच्चार स्पष्ट होतात असे प्रतिपादन श्रीराम संस्कृत विद्यालय (पाठशाळा),ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय,व अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत दिनानिमित्ताने दिनांक - २७/०८/२०२६ रोजी आयोजित पाच दिवसीय शालेय संस्कृत पाठांतर स्पर्धेच्या समारोप व परितोषिक वितरण कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती व नगरसेविका संध्या देठे यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते व नगरसेविका रीमा खरात, संस्कृत भाषा प्रचार समितीच्या उपाध्यक्षा जयश्री कुलकर्णी, स्पर्धा परीक्षक सौ.सुरेखा गव्हाणे,शेषराम सुसर यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती देवीच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. उत्कर्षा कुलकर्णीने स्वागत गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

संध्या देठे मनोगत व्यक्त करतांत म्हणाल्या कि, श्रीराम संस्कृत विद्यालया तर्फे आयोजित शालेय संस्कृत स्पर्धेच्या व्यासपीठामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. संस्कृत भाषेच्या अध्ययनाने विद्यार्थ्याची स्मरणशक्ती वाढते. फेसबुक, व्हाटसॲपच्या जगामध्ये मागील ३२ वर्षा पासून संस्कृत स्पर्धेचा उपक्रम घेऊन अनेक विद्यार्थांमध्ये संस्कृत भाषा टिकूण ठेवण्याचे कार्य श्रीराम संस्कृत विद्यालय करीत असल्याबद्दल त्यांनी संस्थेचे कौतूक केले. ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाची इमारत सुसज्ज *(पान २ वर)*

# जालना जिल्ह्यात अंगणवाडी भरतीचा प्रश्न ऐरणीवर; अनेक केंद्रे सेविका-मदतनीसांविना?

### रिक्त पदांमुळे बालविकास सेवेवर परिणाम होण्याची शक्यता; भरती प्रक्रियेला गती देण्याची मागणी

**दत्ता देशमुख**

जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील जाफराबाद भोकरदन बदनापूर अंबड घनसावंगी परतुर मंठा प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये अनेक अंगणवाडी केंद्रांमध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीसांची पदे रिक्त असल्याचा दावा नागरिकांकडून करण्यात येत असून, त्यामुळे ग्रामीण भागातील बालविकास आणि महिला-बालकल्याणाच्या सेवांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इतर काही जिल्ह्यांमध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांची भरती प्रक्रिया पुढे गेली असताना जालना जिल्ह्यातील रिक्त पदांबाबत प्रशासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रे ही ग्रामीण व दुर्गम भागातील लहान बालकांना पोषण, पूर्व प्राथमिक शिक्षण तसेच विविध शासकीय योजनांशी जोडण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. मात्र, एखाद्या केंद्रावर सेविका किंवा मदतनीस उपलब्ध नसल्यास त्या केंद्राच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

भरतीच्या नियमांमुळे पात्र महिलांमध्ये संभ्रम

अंगणवाडी भरतीसाठी शासनाने निश्चित केलेल्या पात्रता व वयोमर्यादेच्या नियमांमुळे अनेक महिला उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. विशेषतः वयोमर्यादेची अट अत्यंत काटेकोरपणे लागू होत असल्यास पात्र व शिक्षित महिला उमेदवारांना संधीपासून वंचित राहावे लागू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

'वयाची मर्यादा पूर्ण होण्याच्या अवघ्या काही दिवस आधी उमेदवार पात्र असते आणि त्यानंतर वयाचा कालावधी वाढल्यामुळे तीच उमेदवार अपात्र ठरते, तर अशा उमेदवारांसाठी शासनाने काय भूमिका घ्यायची?' असा प्रश्नही उपस्थित होत आहे. मात्र, जालना जिल्ह्यातील सध्याच्या भरती प्रक्रियेस लागू असलेली अधिकृत जाहिरात, पदनिहाय रिक्त जागा आणि वयोमर्यादा यांचा अधिकृत दस्तऐवज तपासल्याशिवाय नेमकी संख्या किंवा नियमाबाबत अंतिम दावा करणे योग्य ठरणार नाही. जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर भरतीसंबंधी सूचना प्रसिद्ध केल्या जातात.

प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न

रिक्त पदे दीर्घकाळ भरली जात नसतील, तर त्यामागील कारण काय? पदे मंजूर असूनही भरती प्रक्रिया रखडली आहे का? आवश्यक प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झालेली नाही का? की अन्य काही कारणांमुळे प्रक्रिया प्रलंबित आहे? असे अनेक प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

शासनाच्या उपलब्ध निर्देशांनुसार अंगणवाडी सेविका व मदतनीसांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करून नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच काही ठिकाणी पूर्वीची भरती प्रक्रिया स्थगित राहिल्यास नव्याने जाहिरात देऊन प्रक्रिया राबविण्याची तरतूदही नमूद करण्यात आली आहे.

'रिक्त पदांचा सर्व्हे करून तातडीने भरती करा'- योगेश बनकर ग्रामपंचायत सदस्य बुटखेडा जालना जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांतर्गत किती अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांची पदे रिक्त आहेत, किती *(पान २ वर)*

# टेंभूर्णीत ३० ऑगस्टला रंगणार भव्य श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव

### *हरे कृष्ण महामंत्राच्या गजराने नगरदुमदुमणार*

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे येत्या रविवार, दिनांक ३० ऑगस्ट रोजी टेंभूर्णी नगरीत श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पावन पर्वावर एका भव्य आणि अध्यात्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामुळे संपूर्ण टेंभूर्णी नगर हरे कृष्ण महामंत्राच्या ध्वनीने आणि भक्तीरसाने न्हाऊन निघणार आहे.



अध्यात्मिक सोहळा

रविवारी सायंकाळी ठीक ७:३० वाजता इस्कॉन सेंटर, टेंभूर्णी येथून भक्तीमय वातावरणात सुरू होईल. तिथून पुढे मार्गक्रमण करत रात्री ८:३० वाजता माळी गल्ली येथील संत सावता मंगल कार्यालय येथे या सोहळ्याचा समारोप होईल

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे उपस्थित भाविकांना अध्यात्मिक विचारांचे अमृत ऐकण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. श्रीमान निताई चैतन्य प्रभू यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार असून, श्रीमान रासगोविंददास प्रभू यांचे प्रेरणादायी व अध्यात्मिक प्रवचन होणार आहे

टेंभूर्णी आणि परिसरातील सर्व कृष्णभक्तांनी, नागरिकांनी या मंगलमयी सोहळ्यात सपरिवार उपस्थित राहावे. नामसंकीर्तन आणि अध्यात्मिक प्रवचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मंडोदरी शामराव ढवळे यांचे वृद्धापकाळाने निधन

**परतूर - प्रतिनिधी**

नूतन परतूर केंद्राचे केंद्रप्रमुख विष्णू ढवळे यांच्या मातोश्री मंडोदरी शामराव ढवळे (वय ९० वर्षे) यांचे आज सकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.




त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, यांच्यासह सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने ढवळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातील शिक्षण क्षेत्र व नातेवाईकांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी २:३० वाजता परतूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मत्स्योदरी तंत्रनिकेतनमध्ये 'माइंड कंडिशनिंग व करिअर प्लॅनिंग' कार्यशाळा

**जालना - प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीला योग्य दिशा मिळावी, तसेच बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगातील करिअरच्या विविध संधींची माहिती व्हावी, या उद्देशाने मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या तंत्रनिकेतनमध्ये 'माइंड कंडिशनिंग व करिअर प्लॅनिंग' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.




कार्यशाळेसाठी एमआयटी इंजिनिअरिंग कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. संदीप पानखडे व प्रा. सचिन लोमटे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक विचारसरणी, आत्मविश्वास, ध्येय निश्चिती, वेळेचे नियोजन, निर्णयक्षमता आणि योग्य करिअर निवड याबाबत मार्गदर्शन केले. बदलत्या औद्योगिक व तंत्रज्ञान क्षेत्रातील संधींचा विचार करून विद्यार्थ्यांनी आपली कौशल्ये विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विचारसरणीचा व्यक्तिमत्त्व, निर्णयक्षमता आणि भविष्यातील यशावर होणारा परिणाम विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मार्गदर्शकांशी संवाद साधला व करिअर, व्यक्तिमत्त्व विकास आणि भविष्यातील संधींबाबत प्रश्न विचारले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य *(पान २ वर)*

# विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळा; शिक्षकांना ग्रामसभेच्या सचिव पदाच्या कामातून सूट देण्याची प्राथमिक शिक्षक संघाची मागणी!

**दत्ता देशमुख**

जालना जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांना ग्रामसभेचे सचिव म्हणून दिलेले अतिरिक्त काम रद्द करण्यासाठी प्राथमिक शिक्षक संघ, जालना च्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना () निवेदन देण्यात आले आहे.या



निवेदनाद्वारे कार्याध्यक्ष श्री. सुभाष भडांगे आणि जालना तालुकाध्यक्ष श्री. प्रमोद पवार यांनी प्रशासनाकडे शिक्षकांच्या हक्काची आणि विद्यार्थ्यांच्या हिताची आग्रही मागणी केली आहे. प्रमुख मागण्या १)नुकत्याच च्या कामातून मुक्त होऊन शाळा पूर्णवेळ सुरू झाल्या आहेत. अभ्यासक्रम मागे पडल्यामुळे शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. अतिरिक्त अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे *(पान २ वर)*

# सिंधीकाळेगावात रक्षाबंधनाचा उत्साह; बहिण-भावाच्या अतूट नात्याला प्रेमाची राखी



**सिंधीकाळेगाव -प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील सिंधीकाळेगाव येथे रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त बहिणींनी आपल्या भावांच्या हातावर प्रेमाचे प्रतीक असलेली राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्याची व सुख-समृद्धीची कामना केली.

बाजारपेठेत राख्या, मिठाई व विविध वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांची लगबग पाहायला मिळाली. बहिणींनी भावांच्या औक्षण करून राखी बांधली, तर भावांनीही बहिणींना प्रेमाची भेट देत त्यांच्या रक्षणाचे व सदैव सोबत राहण्याचे आश्वासन दिले.

रक्षाबंधनामुळे गावातील वातावरण आनंदमय झाले असून, अनेक कुटुंबांमध्ये बहिण-भावांनी एकत्र येत हा पवित्र सण साजरा केला. परंपरा, प्रेम आणि आपुलकीचा संदेश देणारा हा सण सिंधीकाळेगावात उत्साहात पार पडला.

# प्रेषित मुहम्मद यांचे अनुसरण हेच सीरत-ए-रसूलचा महत्त्वाचा पैलू मौलाना मुफ्ती अब्दुल मुकतदिर कासमी

### सीरत-ए-नबी स. कार्यक्रमात ज्येष्ठ उलेमांचे मार्गदर्शन




**परतूर - प्रतिनिधी.**

परतूर शहरातील पठाणपुरा येथील मस्जिद महबूबिया येथे ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने १२ रबीउल अव्वल, बुधवार रोजी सीरत-ए-नबी स. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मजलिस-ए-अहरार ए इस्लाम महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष मौलाना मुफ्ती अब्दुल मुकतदिर कासमी यांनी आपल्या मार्गदर्शनात ''पैगंबर हजरत मुहम्मद स.यांचे अनुसरण करणे हा सीरतचा अत्यंत महत्त्वाचा पैलू असल्याचे सांगितले, त्यांच्या पवित्र जीवनाचा आदर्श प्रत्येक मुस्लिमाने आपल्या जीवनात अंगीकारला पाहिजे,'' असे प्रतिपादन केले.ते म्हणाले की, हजरत मुहम्मद स. त्यांचे संपूर्ण जीवन मानव जातीसाठी आदर्श आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात कधीही कोणाचे नुकसान केले नाही, तर मानवजातीच्या कल्याणासाठी कार्य केले. आपल्या शत्रूंनाही क्षमा करण्याचे महान उदाहरण त्यांनी जगासमोर ठेवले. त्यांच्या उत्तम आचार-विचारांची साक्ष कुरआन शरीफ देतो, आणि त्यांची सीरत आत्मचरित्र, म्हणजे कुरआन शरीफची प्रत्यक्ष व्याख्या आहे. देशप्रेमाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, देशावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाने देशात राहणाऱ्या सर्व समाजातील लोकांशी सहानुभूती, बंधुभाव आणि मानवतेच्या भावनेने वागले पाहिजे. देशाची प्रगती, अखंडता आणि शांतता, एकता यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे.यावेळी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मुस्लिम समाज तसेच उलेमांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. मौलाना हबीबुर्रहमान अहरार ए इस्लाम,शाही इमाम मौलाना उस्मान लुधियानवी, शहीद टिपू सुलतान, मौलाना हुसैन अहमद मदनी, मौलाना महमूद उल हसन, मौलाना कासिम नानौतवी, मौलाना अबुल कलाम आझाद, यांच्यासह देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य उलेमांच्या बलिदानाचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

देशाची एकता, अखंडता आणि देशात राहणाऱ्या सर्व नागरिकांच्या कल्याणासाठी मुस्लिम समाजाने पुढे येऊन सकारात्मक भूमिका बजावावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तसेच समाजाने विविध प्रकारच्या षड्यंत्रांपासून सावध राहावे आणि आपल्या धार्मिक मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी जागरूक राहावे, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.